# बोदवड महाविद्यालयात 'सामाजिक कार्यात विद्यार्थ्यांचे योगदान' या विषयावर उदबोधन संपन्न




कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे शनिवार दि.२१/०७/२०१८ रोजी विद्यार्थी विकास कक्ष व आत्मसम्मान फाउंडेशन यांच्या तर्फे सामाजिक कार्यात विद्यार्थ्यांचे योगदान या विषयावर उदबोधन कार्यक्रम संपन्न झाला

या प्रसंगी आत्मसम्मान फाउंडेशनचे संयोजक श्री विजयसिंग पाटील यांनी विविध शिक्षण सहाय्यता उपक्रमांविषयी विस्तृत माहिती दिली." चांगले शिक्षण प्रत्येकाचा अधिकार, करूयात होतकरू विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार" या संकल्पनेतून साकार झालेल्या आत्मसम्मान फाउंडेशनच्या कार्याबद्दल विवेचन केले. मोठमोठे समारंभ, व्यसन आदींवर होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहाय्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. "आतातरी उठ आणि डोळे उघड भाऊ" या कवितेतून त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.श्री.डी.एस.पाटील हे होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी श्री नरेंद्र जोशी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.गिता पाटील यांनी केले तसेच आभार डॉ.व्ही.पी.चौधरी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अरविंद चौधरी यांनी सहकार्य केले.



